मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

क्रमांक ओएक्साआर-
दिनांक. १२.७.२०१०

प्रति.
अध्यक्ष/सचिव,
कै.वामनरावजी कदम बोर्डीकर
सेवा संस्था, जिंतूर प्रस्तावीत
कृषि महाविद्यालय, सेलू,
जि. परभणी

विषय : विना अनुदानीत तत्वावर कृषि पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तात्पुरत्या स्वरुपात मान्यता देणेबाबत.

संदर्भ :
१. शासन निर्णय क्रमांक कृषिवि-२१९०/सीआर-२०९/२०-ओ, दि. १-७-२०००
२. शासन निर्णय क्रमांक कृषिवि-२००३/प्र.क्र.१४५/२०-ओ, दिनांक. ८-८-२००३
३. शासन निर्णय क्र.एजीयु-१००६/प्र.क्र.१०२/७-ओ, दि.३०.११.२००६
४. शासन निर्णय क्र.एजीयु-१००८/प्र.क्र.४/७-ओ, दि.१७.६.२००८
५. कार्यकारी परिषद ठराव क्र. १८, दि. १८.६.२०१०
६. आपले दि.३.७.२०१० चे व त्यासोबतचे प्रमाणपत्र दि.२.७.२०१०, धर्मदाय आयुक्तालयाचे प्रमाणपत्र दि.३.६.२०००

महोदय,

वरील विषयी कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमार्फत कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर कृषि पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावानुसार व संदर्भीय उपरोक्त शासन निर्णय, कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ चे कलम ३१ (११) मधील अधिकारानुसार व कार्यकारी परिषद ठराव क्र. का-१८, दिनाक १८.६.२०१० नुसार मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून कै.वामनरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतूर अंतर्गत सेलू ता.सेलू, जि.परभणी येथे कृषि पदवी हा चार वर्ष मुदतीचा पदवी अभ्यासक्रम प्रवेश क्षमता प्रतिवर्षी एक तुकडी ६० या प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यासाठी तत्वतः तात्पुरत्या स्वरुपाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदी व कृषि परिषद/विद्यापीठ यांनी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वे व निकषांच्या/अटी व शर्तीच्या अधिन राहून व त्यामधील निकषांची/अटी व शर्तीची आपल्या संस्थेकडून संपूर्ण पुर्तता करण्याच्या अटीवर तात्पुरत्या स्वरुपात मान्यता देण्यात येत आहे.

तुर्तास या पत्राद्वारे आपल्या संस्थेस कायमस्वरुपी विना अनुदानीत तत्वावर तात्पुरत्या स्वरुपाची मान्यता दिली असल्यामुळे व शैक्षणिक वर्ष २०१०-११ पदवी प्रवेश कार्यक्रम सुरु झालेला असल्याकारणाने शासन निर्णयातील तरतुदीनुसार लागणा-या आवश्यक त्या शैक्षणिक सोयी/सुविधांची पुर्तता तीन महिन्याच्या आत होणे आवश्यक आहे व आपल्या महाविद्यालयाची सन २०१०-११ ची प्रवेश प्रक्रिया सुध्दा या बरोबर सुरु करावयाची असल्या कारणाने आपण खाली दर्शविलेल्या बाबींची पुर्तता त्वरीत पूर्ण करावी. हया बाबत विद्यापीठाची तज्ञ समिती वेळोवेळी खात्री करील.



Scanned by CamScanner

१. विद्यापीठ अनामत रक्कम रु. ५.०० लक्षाचा धनाकर्ष नियंत्रक, म.फु.कृ.वि., राहुरी यांचे नावे सादर करण्यात यावा.
२ शासन निर्णयातील तरतुदीनुसार द्यावयाची रु.५.०० लक्षाची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी सादर करण्यात यावी.

वरील बाबी आपणास मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी देणे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे. तसेच या सोबत जोडलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. आवश्यक त्या बाबींची पूर्तता न केल्यास मान्यता पुढे स्थगित करण्याची, प्रवेश प्रक्रिया स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात येत आहेत. या बाबींमुळे किंवा इतर कारणास्तव आपल्या संस्थेच्या सदर महाविद्यालयाची मान्यता काढून घेण्याचे किंवा भविष्यात मान्यता काढून घेण्याची कार्यवाही करणे विद्यापीठास अनिवार्य झाल्यास संस्थेने या शैक्षणिक उपक्रमावर केलेल्या खर्चास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही अथवा कोणत्याही आर्थिक बाबींची विद्यापीठ प्रतीपुर्ती करुन देणार नाही. त्या कारणाने आलेल्या सर्व खर्चाची जबाबदारी संस्थेची/महाविद्यालयाची राहील ही बाब हमी पत्रात नमूद करणे आवश्यक आहे.

सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे पुर्तते करिता/माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी जोडण्यात येत आहेत.

१ पदवी महाविद्यालय सुरु करण्यासाठीच्या पाळावयाच्या अटी व शर्ती.
२ मार्गदर्शक तत्वे (कृषि परिषद/विद्यापीठ)
३ संबंधित शासन निर्णय (४)
४ परिनियम १९९० मधील तरतुद क्रमांक १३३ ते १४६
५ बँक गॅरंटीचा नमुना
६ शैक्षणिक नियमावली (ॲकेडेमीक रेग्युलेशन)
७ हमीपत्राचा नमूना
८ अभ्यासक्रम पुस्तिका

मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने

आपला विश्वासू,

कुलसचिव

Scanned by CamScanner

प्रतिलिपी माहितीस्तव सादर.

१. सचिव (कृषि), कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
२. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२ ब, भाबुडी, मोशलेनगर, पुणे ७

प्रतिलिपी माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित :

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), मकृवि, परभणी यांना माहितीस्तव व पुढील योग्य कार्यवाहीस्तव.
२. संचालक संशोधन/विस्तार शिक्षण /विद्यार्थी कल्याण, मकृवि, परभणी
३. संचालक शिक्षण,महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,१३२ ब, भाबुडी, मोशलेनगर, पुणे-७ यांना देण्यात येऊन विनंती करण्यात येते की, सन ~~२००८-०९~~ २०१०-११ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया संस्थेच्या महाविद्यालयात राबविण्यात यावी.
४. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय,परभणी/ लातूर/अंबाजोगाई/ उस्मानाबाद/ बदनापूर/उद्यानविद्या महाविद्यालय,परभणी/कृषि अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय,परभणी, गृहविज्ञान महाविद्यालय, परभणी यांना माहितीस्तव.
५. नियंत्रक, मकृवि, परभणी. संबंधीत संस्थेमार्फत लेखाविषयक बाबींची पूर्तता करण्यात येते किंवा नाही याबाबतचा पाठपुरावा आपल्या कार्यालयामार्फत करण्यात यावा.

प्रत :

१. उपकुलसचिव, आस्थापना/सामान्य प्रशासन, मकृवि, परभणी
२. या कार्यालयाच्या आस्थापना शाखा/समितीशाखा/सामान्य प्रशासन/ लेखाशाखा/डी-१/डी-२/डी-४/ अ शाखा/ब शाखा/परीक्षा विभाग, मकृवि, परभणी यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, मकृवि, परभणी

D:\higher edu\New College-4 (2006-07)\manyata 2008-09\Naveen manyata 9-10.doc

tukdi


MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER 2008-2009

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१४१३/ २०८

दि. २२जुलै,२०१४

प्रति,

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी),
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ,
परभणी.

विषय:- कै. वामनरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतूर या संस्थेचे कृषी महाविद्यालय, सेलू जि.परभणी या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयास तुकडीवाढ मंजूर करण्याबाबत.

संदर्भ:- (१) आमदार रामप्रसाद कदम बोर्डीकर, विधानसभा सदस्य, सेलू-जिंतूर यांचे दि.निरंक चे पत्र.
(२) कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण/१४१३/१५३३, दि. २०/६/२०१४
(३) कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण/१४१३/१६११, दि. ४/७/२०१४
(४) आमदार रामप्रसाद कदम बोर्डीकर, विधानसभा सदस्य, सेलू-जिंतूर यांचे दि.निरंक चे पत्र.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, सेलू जि.परभणी या महाविद्यालयास या कार्यालयाच्या संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये एक तुकडीवाढ मंजूर करण्यास तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली होती. तुकडीवाढीस आवश्यक निकषांच्या पूर्ततेबाबत कृषी विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर वाढीव तुकडीवर प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले होते.

तथापि, आमदार रामप्रसाद कदम बोर्डीकर, सेलू-जिंतूर मतदार संघ यांनी मा.मंत्री (कृषी व पणन) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांना संदर्भ क्र. ४ येथील दि. निरंक च्या पत्रान्वये सन २०१४-१५ या वर्षापासून वाढीव तुकडीस प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत विनंती केली होती. सदर पत्रावर मा.मंत्री (कृषी व पणन) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांनी दि.१६/७/२०१४ रोजी असे आदेशित केले आहे की, ''एक वर्षाकरिता अटींची पूर्तता करण्याचे हमीपत्र घेऊन सन २०१४-१५ पासून परवानगी देण्यात येत आहे.''

या अनुषंगाने विद्यापीठाने सुचविलेल्या त्रुटींची पूर्तता व वाढीव तुकडीसाठी आवश्यक सोयी-सुविधा एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यात येणार असल्याचे संस्थेकडून रू. १००/- च्या स्टॅम्प

पेपरवर हमीपत्र प्राप्त करून घेतले आहे. सदर हमीपत्र सोबत जोडले आहे. संस्थेने एक वर्षाच्या कालावधीत विद्यापीठाने सुचविलेल्या त्रुटींची पूर्तता व वाढीव तुकडीसाठी आवश्यक सोयी-सुविधांची पूर्तता केली किंवा कसे, याबाबत कृषी विद्यापीठाने कृषी परिषदेकडे अहवाल सादर करावा.

यास्तव वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, सेलू जि.परभणी या महाविद्यालयास सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून एक तुकडीवाढ मंजूर करण्यात येत असून चालू शैक्षणिक वर्षामध्ये सदर महाविद्यालयामध्ये वाढीव प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अतः हमीपत्रानुसार संस्थेने एक वर्षाच्या कालावधीत आवश्यक त्या सोयी-सुविधांची पूर्तता न केल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टिकोनातून सदरची तुकडीवाढ आपोआपच रद्द समजण्यात येईल. याबाबत संस्थेस कोणतीही पूर्वसूचना देण्यात येणार नाही.

मा.महासंचालक यांच्या मान्यतेने.

संचालक (शिक्षण)

प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता अग्रेषित:-

(१) अध्यक्ष, कै. वामनरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतूर जि.परभणी

यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाने सुचविलेल्या त्रुटींची पूर्तता व वाढीव तुकडीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी-सुविधांची पूर्तता एक वर्षाच्या कालावधीत करण्यात यावी. अन्यथा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय वाढीव तुकडीचे सदर आदेश आपोआपच रद्द समजण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

(२) प्राचार्य, कृषी महाविद्यालय, सेलू जि.परभणी

प्रत माहितीकरीता :-

(१) मा. कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी.

(२) मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

२/- सदरील बाब कृपया मा. मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावी.